# प्रकरण १.
# भारतीय राज्यघटनेचा इतिहास

## पार्श्वभूमी

- देशाच्या राज्यघटनेला जरी २६ नोव्हेंबर १९४९ ला मंजुरी मिळाली असली तरी या घटनेची मुहूर्तमेढ स्वातंत्र्ययुध्दाच्या काळातच रोवली गेली होती.
- १८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दापासून १९४७ पर्यंत भारतीयांना ब्रिटिश सत्तेशी सतत संघर्ष करावा लागला. ब्रिटिश राजवटीत जे विविध स्वरुपाचे कायदे, प्रशासकीय कायदे, योजना व सुधारणा करण्यात आल्या त्यांचा प्रभाव आपल्या प्रचलित राज्यघटनेवर निश्चितच पडलेला दिसून येतो.
- पहिला कालखंड व त्यामधील महत्त्वपूर्ण कायदे ज्यामुळे भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी तयार झाली ती पुढील प्रमाणे.

| इंग्लंडचा राजआदेश – १६०० | इंग्लंडचा राजआदेश – १७२६ |
|---|---|
| • या राजआदेशानुसार ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील देशाशी व्यापार करण्याचा एक अधिकार बहाल करण्यात आला.<br>• या राजआदेशानुसार गव्हर्नर व २४ इतर सदस्य भारतात कंपनीचा व्यापार व प्रशासन संभाळणार होते. | • या राजआदेशानुसार कोलकत्ता, मुंबई, मद्रास येथील प्रेन्सीडन्सीच्या गव्हर्नरना कायदे बनविण्याचा अधिकार देण्यात आला.<br>• हा अधिकार इंग्लंडमधील मार्गदर्शक मंडळास होता.<br>• या तिन्ही प्रेंन्सीडन्सी मधील गव्हर्नरनी बनविलेल्या कायदे हे इंग्लंडमधील कायद्याशी विसंगत असु नयेत.<br>• इंग्लंडमधील मार्गदर्शक मंडळ जो पर्यंत मंजुरी देत नाही. |

## ❖ रेग्युलेटिंग ॲक्ट (१७७३):-



- ईस्ट इंडिया कंपनी मूलत: एक व्यापारी कंपनी, पूर्वेकडील राष्ट्रांशी केवळ व्यापार करण्यासाठी स्थापन करण्यात आली होती. कंपनी आर्थिक नफ्याशिवाय अन्य कोणत्याही गोष्टीस प्राधान्य देण्यास तयार नव्हती. त्यातून इंग्लंडच्या राजकीय पातळीवर सक्रिय असलेले पक्ष, त्यांचे संसदेतील नेते व इंग्लंडमधील व्यापारी यांच्यात अनिष्ट स्पर्धा निर्माण झाली. कंपनीच्या अधिकाऱ्यांवर इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये जोरदार टीका सुरु झाली. त्यामुळे कंपनीच्या अनागोंदी कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी १७७३ मध्ये 'रेग्युलेटिंग ॲक्ट' मंजूर केला.

### ❑ या कायद्याच्या महत्त्वाच्या तरतुदी आणि कायद्यामुळे झालेल्या महत्त्वाचा बदल:-

- बंगालचा गव्हर्नर जनरल म्हणुन वॉरन हेस्टिंग यास वार्षिक रुपये २५००० पाँड वेतनावर नियुक्त करण्यात आले त्याचा कार्यकाल ५ वर्षाचा असेल. कंपनीच्या घटनेत बदल करण्यात आला व कंपनीच्या डायरेक्टर्सचा कारभार पार्लमेंटने नियुक्त केलेल्या देखरेख समितीस जबाबदार राहील. कंपनीच्या संचालकांनी हिंदुस्थानातील मुलकी, लष्करी व महसुली व्यवहाराबाबतची सर्व कागदपत्रे इंग्लंडच्या मंत्रिमंडळापुढे ठेवावीत.
- हिंदुस्थानातील बंगालचा कारभार गव्हर्नर जनरल व त्याचे कौन्सिल यांच्यातर्फे चालावा आणि त्यांना मद्रास व मुंबई प्रांतातील युध्द व शांतता यासंबंधी कारवाई करण्याचा अधिकार देण्यात आला.
- युरोपियन, त्यांचे कर्मचारी आणि कलकत्त्याचे नागरिक यांच्या दाव्याचा निकाल देण्यासाठी सर्वोच्च न्यायालय कलकत्त्यात स्थापन करण्यात आले. संचालक मंडळाची मुदत १ वर्षावरुन ४ वर्षे करण्यात आली.
- संचालकांची संख्या २४ करण्यात आली, त्यांच्यापैकी १/४ संचालक (६ संचालक) दरवर्षी निवृत्त होतील व त्याऐवजी तेवढेच नवीन भरले जातील. गव्हर्नर जनरलच्या मदतीला ४ सदस्यांचे एक कौन्सिल नियुक्त करण्यात आले. कौन्सिलने बहुमताने निर्णय घ्यावेत. निर्णायक मत देण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला असेल.

## ❖ पिट्स इंडिया ॲक्ट (१७८४):-




- १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्ट चे दोष दुर करण्यासाठी इंग्लंडचे पंतप्रधान 'पिट' यांनी १७८४ मध्ये हा कायदा केला. यामुळे ईस्ट इंडिया कंपनीवरचे ब्रिटिश प्रशासनाचे नियंत्रण अधिकच घट्ट झाले.
- या कायद्याने भारतीय ब्रिटिश प्रशासनात पुढील बदल झाले.

- ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी इंग्लंडमध्ये एक ६ सदस्याचे नियामक मंडळ (Board of Control) निर्माण करण्यात आले. या मंडळाकडे महसुल लष्करी व मुलकी अधिकार देण्यात आले. (६ पैकी २ सदस्य इंग्लंडच्या मंत्रीमंडळातील कॅबिनेट मंत्री)
- या कायद्याने गव्हर्नर जनरच्या समितीतील सदस्याची संख्या ४ ऐवजी ३ ठेवली गेली.
- बंगालचा सेनापती हा अन्य प्रांतातील सेनापतीच्या दर्जाने श्रेष्ठ राहिल.
- संचालक मंडळाचे विशेषधिकार या कायद्याने कायम ठेवले. भारतातील कोणत्याही सत्तेविरुध्द युध्द सुरु करण्यासाठी संचालक मंडळाची परवानगी घेणे गव्हर्नर जनरलला आवश्यक होते.
- ईस्ट इंडियाच्या नियंत्रणाखालच्या प्रदेशाला 'ब्रिटिश प्रदेश' असे संबोधण्यात आले.
- नियामक मंडळ व संचालक मंडळाच्या माध्यमातुन १८५८ पर्यंत कारभार चालविण्यात आला.
- नियामक मंडळाकडे परराष्ट्र व्यवहार तर संचालक मंडळाकडे अंतर्गत कारभार होता.

- या कायद्याने कंपनीच्या सत्तेचे हस्तांतरण पूर्णपणे पार्लमेंटकडे झाले. ब्रिटिश भारतातील मुलकी व लष्करी प्रशासनावर पार्लमेंटचे नियंत्रण प्रस्थापित झाले. भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणावरही पार्लमेंटचे नियंत्रण झाले. नियामक मंडळ व संचालक मंडळाचे अधिकार क्षेत्र पूर्णपणे स्पष्ट न केल्याने उभय मंडळात अनेक वेळा वाद उद्‌भवत असत.

## ❖ १७९३ चा सनदी कायदा (चार्टर ॲक्ट) / सुधारणा कायदा :-




- या कायद्यानुसार गव्हर्नर जनरलचे प्रांतिक गव्हर्नरवरील अधिकार निश्चित करण्यात आले. प्रांतिक गव्हर्नर आपापल्या प्रांतात जे कायदे-कानुन तयार करीत ते तपासण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला होता. या कायदयाने कंपनीचा भारतात व्यापार करण्याचा अधिकार २० वर्षांनी वाढवून देण्यात आला.
- मुंबई व मद्रास प्रांत हे बंगालच्या गव्हर्नर जनरलच्या अधिकारक्षेत्रात आणण्यात आले.

## ❖ १८१३ चा सनदी कायदा (चार्टर ॲक्ट) / सुधारणा कायदा:-

- इ.स.१८१३ मध्ये कंपनीला मिळालेल्या वीस वर्षाच्या सनदेची मुदत संपली होती. त्यामुळे ती वाढवून द्यावी किंवा नाही यावर चर्चा होऊन खालील तरतुदी करण्यात आल्या.
- कंपनीचा कालावधी वीस वर्षासाठी आणखी वाढवून दिला.
- फक्त चहाचा व्यापार सोडून इतर सर्व वस्तुंचा भारताशी व्यापार करण्याची ईस्ट इंडिया कंपनीची मक्तेदारी रद्द करण्यात आली.
- चीन या देशाशी व्यापार करण्याची कंपनीची मक्तेदारी पुर्ववत कायम ठेवण्यात आली.
- एका ठराविक संख्येत ख्रिस्ती धर्मोप्रदेशकांना धर्मप्रसारासाठी भारतात पाठविण्याचे मान्य करण्यात आले.
- कंपनीच्या नोकरीत प्रवेश करणाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली.
- भारतात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी दरवर्षी एक लाख रुपये खर्च करण्यास मान्यता देण्यात आली.

## ❖ १८३३ चा सनदी कायदा (चार्टर ॲक्ट) / सुधारणा कायदा :-

❑ पुन्हा २० वर्षांनी कंपनीला नवी सनद देण्यात आली त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे:-

- १८३३ मध्ये कंपनीच्या नुतनीकरणाचा प्रश्न पुन्हा ब्रिटिश संसदे समोर आला व त्यास मान्यता मिळाली. या कायद्यानुसार कंपनीस इग्लंडच्या राजा / राणीचे विश्वस्त म्हणून कार्य करण्यास परवानगी मिळाली.
- चीन व भारताशी चहाचा व्यापार करण्याची कंपनीची मक्तेदारी समाप्त करण्यात आली.
- कंपनीच्या भागीदारांना शेकडा १०% पेक्षा जास्त फायदा वाटण्यात येऊ नये. ही रक्कम भारताच्या खजिन्यातुन देण्यात यावी.
- वायव्य प्रांत नव्याने तयार करण्यात येऊन त्या प्रांतावर चार्लस, मेटकॉफ याची नेमणुक करण्यात आली.
- बंगालच्या गव्हर्नर जनरलला आता भारताचा गव्हर्नर जनरल असे नाव बहाल करण्यात आले.
- या कायद्यानुसार भारतीय कायदा व्यवस्था संहिता बध्द करण्यासाठी 'कायदा आयोग' स्थापन करण्यात आला.
- सन १८१३ च्या सनदी कायद्यानुसार व्यापारी व ख्रिस्ती धर्मोपदेशकांना भारतात येण्यासाठी परवाने घ्यावे लागत. आता या कायद्यानुसार त्यांना परवाने घेण्याची गरज नाही हे मान्य करण्यात आले.

- या कायद्यानुसार कंपनीच्या सेवेत भरती करताना धर्म, जन्म, वंश, वर्ग या बाबींवरुन भेदभाव केला जाणार नाही असे स्पष्ट करण्यात आले.
- भारतीयांना उच्च पदे मिळण्याचा मार्ग खुला झाला.
- गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्ये एक कायद्याचा सभासद घेतला जाऊ लागला. त्यानुसार लॉर्ड मेकॉलेची नेमणूक करण्यात आली. गव्हर्नर जनरलला संपूर्ण देशासाठी कायदे तयार करण्याचा अधिकार देण्यात आला. पण ते कायदे पार्लमेंटच्या कायद्यांशी विसंगत नसावेत. पूर्वी कौन्सिलने पास केलेल्या ठरावाना नियम (Regulation) या नावाने ओळखले जाई. आता त्यास कायद्याचे स्वरुप देण्यात आले.
- या कायद्याला आर्थिक केंद्रीकरणाचा कायदा म्हणतात.
- या कायद्यानुसार लॉर्ड विल्यम बेटिंग हे भारताचे पहिले गव्हर्नर जनरल बनले.
- स्वतंत्र भारताचे पायाभूत मानले गेलेले 'इंडियन पिनल कोड' (IPC) लिहिणारा मॅकॉले पहिला 'लॉ मेंबर(कायदा सदस्य)' होता.

## ❖ १८५३ चा सनदी कायदा (चार्टर ॲक्ट):-

- ईस्ट इंडिया कंपनीची मुदत वाढवुन द्यायची की नाही याविषयी भिन्न-भिन्न मतप्रणाली होत्या. काहींच्या मते कंपनीचे कार्य संपुष्टात आणुन ती बंद करावी तर काहीच्या मते कंपनीची सत्ता पूर्वीप्रमाणेच कायम ठेवावी. या काळात भारतातील नवसुशिक्षित लोकही भारतात घटनात्मक सुधारणा व्हाव्यात म्हणून आंदोलन करीत होते. या सर्व गोष्टींचा विचार करुन या सनदी कायद्यात पुढील तरतुदी करण्यात आल्या.
- या कायद्याने कंपनीची मुदत वीस वर्षांनी वाढवून न देता जोपर्यंत पार्लमेंट तिचा अधिकार रद्द करीत नाही. तोपर्यंत तिने भारतात कार्य करावे.
- बोर्ड ऑफ कंट्रोल या मंडळाच्या अध्यक्षाचा दर्जा वाढवून त्याला इंग्लंडच्या मंत्र्यांचा दर्जा देण्यात आला.
- १८४० नंतर कंपनीने घेतलेल्या भारतीय प्रदेशांची व्यवस्था लावण्याचा अधिकार कंपनीला दिला गेला.
- उच्चधिकारपदे भरण्यासाठी इंग्लंडमध्ये सनदी परीक्षा (ICS) सुरु करण्यात यावी असे ठरले.
- कायदा करणे आणि प्रशासन चालविणे या दोन्ही बाबी परस्परांपासून वेगळया करण्यात आल्या.
- प्रशासनात अधिकारी नेमण्याचा कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचा अधिकार रद्द करुन स्पर्धा परीक्षेव्दारा उमेदवार नियुक्ती आवश्यक केली गेली.
- बंगालच्या गव्हर्नरची नियुक्ती स्वंतत्रपणे करण्यात आली. भारताचा गव्हर्नर जनरल म्हणुन त्याचे अधिकार कमी करण्यात आले. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सदस्यसंख्या २४ वरुन १८ आणली गेली.

## ❖ ब्रिटिश सत्तेच्या कालखंडातील कायदे:-

## ❖ भारत सरकारचा कायदा (१८५८):-



- १८५७ च्या उठावाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे १८५८ चा कायदा होय. या कायद्याने ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन बरखास्त करुन ब्रिटिश पार्लमेंटने भारतातील साम्राज्य व प्रशासनाची जबाबदारी स्वीकारली होती. या प्रशासनाची प्रमुख या नात्याने इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाच्या नावाने तत्कालीन गव्हर्नर जनरल कॅनिंग याने अलाहाबाद येथे एक जाहीरनामा काढला यास 'राणीचा जाहीरनामा' म्हटले जाते. या जाहिरनाम्यातील बदल प्रत्यक्षात आणण्यासाठी १८५८ चा कायदा करण्यात आला.

### ❑ यातील महत्त्वाची आश्वासने पुढीलप्रमाणे:-

- कंपनी सरकारने हिंदी संस्थानिकांशी केलेले सर्व तह/करार पाळण्यात येतील.
- हिंदी संस्थानांचे स्वातंत्र्य कायम ठेवून ती ब्रिटिश राज्यात समाविष्ट करण्यात येणार नाहीत. त्याचप्रमाणे 'संस्थाने खालसा करण्याचे धोरण' (Doctrine of Lapse) सोडून देण्यात येईल.
- संस्थानिकांचे सर्व हक्क व मानमरातब पूर्वीप्रमाणे चालू राहतील.
- हिंदी लोकांचे धार्मिक स्वातंत्र्य कायम ठेवण्यात येईल.
- हिंदी लोकांना त्यांच्या पात्रतेनुसार प्रशासनातील उच्च पदे देण्यात येतील.
- दत्तक वारस मंजूर करण्यात येतील.
- हिंदी लोकांचे हित पाहणारी यंत्रणा तयार करण्यात येईल.

### ❑ १८५८ च्या कायद्यानुसार करण्यात आलेले घटनात्मक बदल पुढीलप्रमाणे :

- या कायद्यानुसार भारताचा कारभार पाहण्यासाठी 'भारतमंत्री' हे पद निर्माण करण्यात आले. त्याच्याकडे भारताच्या प्रशासनाची सर्व जबाबदारी व सुत्रे देण्यात आली.
- भारत मंत्र्यास सल्ला देण्यासाठी १५ सदस्यांचे एक सल्लागार मंडळ नेमण्यात आले, त्यास 'इंडिया कौसिल' म्हणून ओळखले जाई. या मंडळात ७ सदस्य कंपनीच्या संचालक मंडळाने आणि ८ सदस्य संसदेतर्फे नेमण्यात यावेत असे ठरले. भारतमंत्री हा भारतीय प्रशासनाचा इंग्लंडमधील प्रमुख होता.
- भारतीय प्रशासकीय जबाबदारी प्रत्यक्षपणे पार पाडण्यासाठी या कायद्यानुसार 'व्हाईसरॉय' हे नवीन पद निर्माण करण्यात. व्हाईसरॉय हा इंग्लंडच्या राजपदाचा प्रतिनिधी म्हणून कार्य करील. यानुसार १८५७ मध्ये गव्हर्नर जनरल असलेला कॅनिंग या कायद्यानुसार पहिला व्हाईसरॉय बनला.
- ईस्ट इंडिया कंपनीचे नियंत्रक व संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले.
- भारतमंत्री हा ब्रिटिश संसद व मंत्रिमंडळाचा सदस्य असून तो भारतीय शासनव्यवस्थेबाबत संसदेस जबाबदार ठरविण्यात आला.
- व्हॉईसरॉय आणि गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती इंडिया कौंसिलच्या सल्ल्याने भारतमंत्री करीत असे.
- १८५८ च्या या कायद्याने भारतातील मोगल सत्तेचा व ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा अस्त झाला. राणी एलिझाबेथच्या काळात इ.स. १६०० मध्ये स्थापन झालेली ईस्ट इंडिया कंपनी १ सप्टेंबर १८५८ ला बरखास्त झाली.
- ब्रिटनचा पंतप्रधान लॉर्ड डर्बी यांच्या कार्यकाळात हा कायदा व राणीचा जाहीरनामा प्रस्तुत करण्यात आला, हा कायदा भारताच्या सुशासनाचा कायदा म्हणून ओळखला जातो.

## ❖ १८६१ चा कौन्सिल कायदा:-



- १८६१ च्या कायद्यानुसार प्रथमच भारतात कायदेमंडळ अस्तित्वात आले.
- गव्हर्नर जनरलच्या कायदेमंडळात किमान ६ व कमाल १२ सभासद नेमण्यात यावेत, तर प्रांतीय कायदेमंडळात किमान ४ आणि कमाल ८ सभासद नेमण्यात यावे असे ठरले.
- भारतात गव्हर्नर जनरल (ब्रिटिश सरकारचा प्रतिनिधी) आणि व्हाईसरॉय (राणीचा प्रतिनिधी) अशी दोन अधिकारपदे निर्माण करुन या दोन अधिकारपदावर एकाच व्यक्तीची नेमणुक केली जाई.
- प्रांतीय कायदेमंडळ स्थापण्याचा, सदस्य नियुक्त करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला असेल.
- या कायद्यामुळे १८५८ च्या कायद्यातील दोष दूर झाले. या कायद्याने भारतीय लोकांना प्रथमच कार्यकारी मंडळाचे सदस्य नियुक्त करण्यात आले. आतापर्यंत एकच कायदेमंडळ संपूर्ण भारतासाठी होते, या कायद्याने मुंबई व मद्रास येथेही प्रांतिक कायदेमंडळ निर्माण केले गेले.
- या कायद्याने कायदे करण्याच्या कार्यात अल्पप्रमाणात का होईना हिंदी लोकांचे सहकार्य घेण्याचा प्रयत्न झाला. या कायद्याने कायदेमंडळाच्या विकासाला साहाय्य केले. न्यायालयीन क्षेत्रात कायद्याने 'भारताच्या उच्च न्यायालयाचा कायदा' संमत करण्यात आला.
- व्हाईसरॉयला सहा महिन्यांसाठी वटहुकूम काढण्याचा अधिकार देण्यात आला. (जो आता राष्ट्रपती व राज्यपालास आहे)

## ❖ १८९२ कौन्सिल कायदा:-

- या कायद्याने कायदेमंडळातील भारतीय सभासंदाची संख्या वाढविली.
- प्रांतिक विधिमंडळात किमान ८ व कमाल २० सदस्य नेमले. तर केंद्रीय विधिमंडळातील सदस्यसंख्या किमान १० व कमाल १६ असावी असे ठरले.
- सभासदांना वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा अधिकार देण्यात आला, परंतु मतदान करण्याचा अधिकार नाकारण्यात आला. सदस्यांना सार्वजनिक बाबीसंबंधी सरकारला प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला, उपप्रश्न विचारण्याचा अधिकार नाकारला.
- प्रथमच अप्रत्यक्षपणे निवडणुकीचे तत्व स्वीकारण्यात आले.
- विद्यापीठातील कार्यकारी मंडळ व्यापाऱ्यांचे चेंबर ऑफ कॉमर्स व स्थानिक स्वराज्य संस्थाचा एक प्रतिनिधी यांची निवड करण्याचा अधिकार त्या संस्थाना दिले.

## ❖ १९०९ चा मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा:-





१. मोर्ले हा इंग्लंडमध्ये भारतमंत्री होता व मिंटो हा गव्हर्नर जनरल होता. मुस्लीम लीग व राष्ट्रीय सभेतील मवाळांना खुश करण्याच्या हेतुने हा कायदा केला.
२. या कायद्यामुळे प्रत्यक्ष निवडणुकीचे तत्त्व मान्य झाले. त्याकरिता सामान्य, वर्गीय व खास मतदार संघ अशी विभागणी करण्यात आली.
३. या कायद्यानुसार केंद्रीय कायदेमंडळातील सदस्यांची संख्या १६ वरुन ६० पर्यंत वाढविली.
४. केंद्रीय विधिमंडळाच्या आकारा बरोबरच त्याचे अधिकारक्षेत्रेही या कायद्यान्वये व्यापक करण्यात आले. प्रांतीय विधिमंडळातील सदस्यसंख्येत वाढ करण्यात आली ही वाढ प्रांताच्या आकारावर व महत्त्वावर अवलंबून होती.
५. या कायद्यामुळे मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले.
६. विधिमंडळाचे अधिकारक्षेत्र या कायद्यान्वये विस्तारले. प्रांतिक अर्थसंकल्पावर तपशीलवार चर्चा करण्याचा त्यात बदल सुचविणारे प्रस्ताव मांडण्याचा तसेच सार्वजनिक हिताच्या बाबीवर चर्चा करण्याचा, प्रश्न व पुरवणी प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळाला.
७. वरिष्ठ कायदेमंडळात सरकारी प्रतिनिधींचे तर प्रांतिक कायदेमंडळात बिनसरकारी सदस्यांचे बहुमत राखण्यात आले.
८. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात एका भारतीयाची व इंडिया कौन्सिलमध्ये दोन भारतीयांची नियुक्ती केली.
९. उपराज्यपालांना (लेफ्टनंट गव्हर्नर) स्वत:ची कार्यकारिणी स्थापण्याचा अधिकार मिळाला.
१०. १९०९ चा कायदा म्हणजे १८९२ ते १९०७ या काळात काँग्रेसने केलेल्या कार्याचे फळ होते. तसेच कर्झनचे धोरण, जहालवादाचा उदय, बंगालची फाळणी हेही घटक या कायद्यास पूरक ठरले.

## ❖ १९०९ च्या सुधारणा कायद्याचे दोष:-

१.हिंदुस्थानला राजकीय सुधारणा देण्यासंबंधी चर्चा सुरु झाल्याने काँग्रेसचे मवाळवादी नेते आनंदी झाले. ना. गोखले यांनी याचे वर्णन 'An Exceedingly Important Step' असे केलेले होते. विधिमंडळातील बिनसरकारी सभासदांमार्फत आपण सरकारवर नियंत्रण ठेवू असे काँग्रेसला वाटत होते ते खोटे ठरले. या वेळी हिंदी लोक जबाबदार राज्यपध्दतीची मागणी करीत होते. बिनसरकारी सभासदांना निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त होईल या साऱ्या आशा फेल ठरल्या.

२. प्रांतीय व केंद्रीय कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्याची पात्रता ठरविण्याचा सर्वस्वी अधिकार सरकारला होता. कोणत्याही उमेदवाराला अपात्र हद्दपारीची ज्यांना शिक्षा झालेली आहे ते अपात्र ठरत. जहालवादी नेते कायदेमंडळात येऊ नयेत यासाठी ही अट घालण्यात आलेली होती.

३. केंद्रीय व प्रांतीय कायदेमंडळात हिंदी सभासदांना प्रवेश मिळाला. परंतु दोन्ही कायदेमंडळात सरकारचेच बहुमत असल्याने आणि लोकप्रतिनिधीच्या अधिकारावरील अनेक निर्बंध यामुळे त्यांची अडचण होत असे. कायदेमंडळात प्रश्न विचारणे, चर्चा करणे, ठराव मंजुर करणे, अदांजपत्रकावर चर्चा करणे, सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करणे इत्यादी संदर्भात अधिकार होते. परंतु अंतिम निर्णयाचा अधिकार सरकारकडे होता.

## ❖ १९१९ चा मॉटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा:-





१. १९१४ पासुन इंग्लंड पहिल्या महायुध्दात गुंतलेले होते. इंग्लंडला भारताची मदत हवी होती. भारतीय जनतेचा असंतोष कमी करण्याच्या दृष्टीने २० ऑगस्ट १९१७ रोजी भारतमंत्री माँटेग्यु यांनी भारताचे स्वराज्य हेच ब्रिटिश सरकारचे ध्येय असल्याचे स्पष्ट केले.
२. १९१६ मध्ये हिंदु-मुस्लीम ऐक्याचा लखनौ करार करण्यात आला होता. होमरुल चळवळीमुळे स्वायत्तेच्या मागणीने जोर धरला होता. भारतमंत्री माँटेग्यु यांनी भारतीयांची ही मागणी योग्य ठरवुन १९१९ चा कायदा संसदेत पास करवून घेतला व भारताला जबाबदार शासनपध्दती क्रमाक्रमाने देण्याचे ब्रिटिशांचे उद्दिष्ट स्पष्ट झाले.
३. केंद्रिय विधिमंडळात 'कौन्सिल ऑफ स्टेट' हे वरिष्ट सभागृह तर 'लेजिस्लेटिव्ह असेंब्ली' हे कनिष्ठ सभागृह निर्माण झाले.
४. ब्रिटिश शासनाखाली असलेल्या भारतासाठी कायदे करण्याचा किंवा पुर्वीच्या कायद्यात बदल करण्याचा हक्क या सभागृहाला देण्यात आला.
५. काही विशिष्ट विषय वगळता इतर सर्व विषयांवर अंदाजपत्रकीय चर्चा करण्याचा आणि मतदान करण्याचा हक्क सभासदांना देण्यात आला.

६. प्रांतामध्ये व्दिदल राज्यपध्दती सुरु करण्याचा प्रस्ताव या कायद्यान्वये मांडण्यात आला. त्यानुसार प्रांतामध्ये राखीव खाती ब्रिटिश सरकारकडे तर सोपीव खाती भारतीय मंत्र्याकडे सोपविली. यालाच 'डाय र्ची' सिस्टम म्हणतात.
७. गव्हर्नरांना व्यापक अधिकार देऊन मंत्र्यांना कोणतेही कारण न सांगता पदावरुन दूर करण्याचा अधिकार देण्यात आला. अर्थ, महसूल, गृह यासारखी महत्त्वाची खाती गव्हर्नरच्या ताब्यात होती.
८. या कायद्याने प्रशासनात पुढीलप्रमाणे तत्वे निश्चित केली. स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका व जिल्हा मंडळे या संस्था स्वयंशासित असण्यात त्यांच्या कामकाजात सरकारचा हस्तपेक्ष नसावा.
९. प्रांतिक सरकार - प्रांतात हळूहळू जबाबदार राज्यपध्दती लागु केली जाईल.
१०. भारत सरकार- भारतीय केंद्र सरकार हे ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार राहील.
११. भारतमंत्री हा ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार राहील.
१२. मुंबई, आसाम, पंजाब, संयुक्त प्रांत, बिहार, मध्यप्रांत या प्रांतात व्दिदल राज्यपध्दती लागु करण्यात आली.
१३. भारतमंत्र्यांचे वेतन ब्रिटिश तिजोरीतुन द्यावे. भारतमंत्र्यास मदतीस म्हणून दोन उपमंत्री नियुक्त केले.
१४. या कायद्याने लोकसेवा आयोगाची स्थापना झाली.
१५. याच कायद्यानुसार मतदान, लोकशाही, निवडणुका इत्यादीचा परिचय भारतीयांना झाला.

## ❖ १९३५ चा कायदा / हिंदुस्थान सरकारचा कायदा / भारतीय संघराज्याचा कायदा:-

सायमन कमिशनने सादर केलेला अहवाल, गोलमेज परिषदांमधील चर्चा आणि १९२० ते १९३२ या काळात काँग्रेस आणि मुस्लीम लीगने केलेल्या विविध मागण्या लक्षात घेऊन १९३५ चा संघराज्याचा कायदा पास करण्यात आला.

१. या कायद्यानुसार असे ठरले की केंद्रांत संघराज्य निर्माण करावे, या संघराज्यात ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रांत आणि संस्थाने असावीत. मात्र संघराज्यात सामील होण्यासाठी संस्थानावर सक्ती नसावी.
२. १९१९ च्या कायद्याने निर्माण झालेली प्रांतातील व्दिदल राज्यपध्दती रद्द करुन त्याऐवजी 'प्रांतीक स्वायत्ता' दिली.
३. प्रांताच्या गव्हर्नरला विशेषाधिकार व नकारधिकार दिला.
४. मतदानाचा अधिकार पुर्वीपेक्षा मोठया प्रमाणात विस्तारीत केला.
५. संघराज्याचे घटक विरुध्द केंद्र किंवा एक घटक विरुध्द दुसरा घटक यांच्यामधील संघर्ष / वाद मिटविण्यासाठी संघराज्याच्या कोर्टाची स्थापना केली गेली.
६. भारतमंत्र्याचे इंडिया कौन्सिल रद्द करण्यात आले. त्याऐवजी भारतमंत्र्यांला सल्ला देणारे सल्लागार नियुक्त करण्यात येऊ लागले.
७. या कायद्यानुसार १९३७ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. ८ प्रांतात काँग्रेसला तर ३ प्रांतात मुस्लीम लीगला मताधिकार मिळाल्यामुळे तेथे त्यांची सरकारे अस्तित्वात आली. या सरकारांनी २ वर्षापेक्षा अधिक काळ राज्य कारभार केला. काँग्रेस मंत्रिमंडळांनी अनेक आर्थिक व लोक कल्याणकारी सुधारणा करणारे कायदे केले.
८. सिंध व ओरिसा हे दोन नवे प्रांत निर्माण करण्यात आले.
९. या कायद्याने जातीय मतदार संघाचा पुरस्कार केला गेला. मुसलमान, शीख, ख्रिश्चन एवढेच काय स्त्रिया व कामगार यांनाही स्वतंत्र मतदारसंघ देऊन या कायद्याने राष्ट्रीय एकात्मता प्रहार केला.
१०. हा कायदा बदलण्याचा हक्क हिंदी कायदेमंडळाला नसून तो ब्रिटिश पार्लमेंटलाच होता.

➢ जवाहरलाल नेहरुंनी या कायद्याचे वर्णन 'अनेक नियंत्रणे असलेले पण इंजिनच नसलेले यंत्र' या शब्दात केले. तर,
➢ पं. मदनमोहन मालवीयांच्या मतेही 'ही पोकळ लोकशाही' होती.

या कायद्यान्वये एकसंघीय फेडरल युनियनची तरतूद करणे हे होते. १० पेक्षा अधिक नाहीत इतक्या मंत्र्यांची एक मंत्रीपरिषद गव्हर्नर जनरलला आपली कर्तव्ये पार पाडण्यात सल्ला व साहाय्य देण्यासाठी असणार होती. सम्राटचे प्रतिनिधी म्हणून गव्हर्नर जनरल व कौन्सिल ऑफ स्टेट व हाऊस ऑफ असेंब्ली मिळून संघीय कायदेमंडळ असणार होते. यामध्ये ब्रिटिश इंडियामधील १५६ प्रतिनिधी, संस्थानातील १०४ प्रतिनिधी तर ब्रिटिश इंडियातील २५० व संस्थानातील १२५ पेक्षा अधिक नसतील इतके प्रतिनिधी असणार होते. कौन्सिल ऑफ स्टेट हे कधीच विसर्जित न होणारे म्हणजे कायम राहणारे सदन होते. दर ३ वर्षांनी एकूण सदस्यसंख्येच्या १/३ सदस्यांनी निवृत्त होण्याची तरतूद गव्हर्नर जनरलने संमती दिलेले कायदाही सम्राट रद्द करु शकणार होता. गव्हर्नर जनरल असे विधेयक पुन्हा सदनाकडे फेरविचारार्थ पाठवू शकणार होता. दोन सदनात विधेयकाच्या मंजुरीबाबत मतभिन्नता झाल्यास गव्हर्नर जनरल दोन्ही सदनाची संयुक्त बैठक बोलविता येत होती. आणि बहुमतानुसार निर्णय घेता येत होता.

१) संघराज्य शासन पध्दती स्वीकारण्यात आली. या कादद्याने भारतीय संस्थानिक व संस्थानेतर, ब्रिटिश भारत यांचे एकत्रित संघराज्य स्थापण्याची योजना मांडण्यात आली.

२) या कायद्यानुसार केंद्रीय राज्यकारभाराच्या खात्यांची तीन भागात विभागणी केली.

| | | |
|---|---|---|
| अ) | संघसूची | ५९ विषय |
| ब) | प्रांतीय सूची | ५४ विषय |
| क) | समवर्ती सूची | ३६ विषय |

३) मध्यवर्ती कायदेमंडळ द्विगृही राहणार होते राज्यसभा हे वरिष्ठ गृह व संघराज्य परिषद हे कनिष्ठ सभागृह राहणार होते.
४) केंद्रस्थानी द्विदल शासन पध्दती सुरु करण्यात आली.
५) व्हाईसरॉयच्या अधिकारात वाढ होऊन तो वास्तववादी प्रमुख बनला.
६) भारतीय संघराज्याकरिता संघीय न्यायालयाची स्थापना करुन १ ऑक्टोबर १९३७ पासून संघराज्य न्यायालयाचे कामकाज सुरु झाले.
७) रेल्वेचा स्वतंत्ररीत्या कारभारासाठी फेडरल रेल्वे ॲथॉरिटी या ७ सदस्यीय मंडळाची स्थापन झाली.
८) ॲडव्होकेट जनरल हे पद निर्माण करण्यात आले.
९) या कायद्याने प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली प्रांतांतील द्विदल पध्दती समाप्त करण्यात आली.
१०) प्रांतात द्विगृहात्मक पध्दत सुरु झाली. आसाम, बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मुंबई व मद्रास येथे द्विगृही कायदेमंडळ प्रस्थापित केली.

- भारतमंत्री बर्कनहेडच्या आव्हानावरुन पं. मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय परिषदेने अहवाल तयार केला होता. (नेहरु रिपोर्ट)
- सायमन कमिशन व गोलमेज परिषदांतील अहवालावर आधारित १९३५ चा कायदा तयार झाला. यात अनेक तरतूदी होत्या. घटनेची रुपरेषा यात मांडण्यात आली. या कायद्याने केलेल्या ११ प्रांतामध्ये फेब्रुवारी १९३७ मध्ये निवडणूका झाल्या.
- दुसऱ्या महायुद्धात भारत इंग्लंडच्या बाजूने युद्धात उतरेल अशी परस्पर घोषणा केल्याने १९३९ मध्ये प्रांतीक राजीनामे दिले.
- १९४२ ला क्रिप्स मिशनने घटनासमितीच्या निर्मितीचे आश्वासन दिले पण क्रिप्स मिशन असफल ठरले.
- १९४२ मधील क्रिप्स मिशनचा प्रस्ताव कॉंग्रेस व मुस्लिम लीगने नाकारला.
- जून १९४५ मध्ये इंग्लंडमध्ये निवडणूका झाल्या त्यात चर्चिल पराभूत होऊन क्लेमेंट ॲटलींच्या नेतृत्त्वाखाली मजूर पक्ष सत्तेवर आला व इतर जागतिक परिस्थितीमुळे इंग्लंडचे भारतविषयक धोरण बदलले.
- १९४५ मध्ये भारतात निवडणूका झाल्या व ७ प्रांतात कॉंग्रेसला बहुमत मिळाले. ॲटलींच्या घोषणेत भारतीयांना राज्यघटना तयार करण्याचा हक्क देण्यात येईल असे जाहीर केले.
- २४ मार्च १९४६ ला नियुक्त केलेले कॅबिनेट मिशन भारतात आले. त्यात स्ट्रॅफर्ड क्रिप्स, पॅथिक लॉरेन्स, ए.व्ही. अलेक्झांडर यांचा समावेश होता. त्यात अनेक तरतूदी होत्या. घटना समितीची स्थापना करावी ही पण तरतूद त्यात होती.
- २ सप्टेंबर १९४६ ला हंगामी सरकार पं. नेहरुंच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. पुढे १८ जुलै १९४७ भारत स्वातंत्र्य कायदयाने या समितीला अधिकृत दर्जा दिला.
- स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकार कायदे करत होते. भारताची राज्यघटना कशी असावी हे ठरवणारी भारतीय प्रतिनिधींचीच समिती असावी अशी मागणी कॉंग्रेसच्या नेत्यांनी केली.
- १९४६ मध्ये घटना समितीच्या अप्रत्यक्ष पध्दतीने निवडणूका होऊन प्रांताचे व संस्थानाचे प्रतिनिधी या समितीवर निवडून आले.
- १९४६ च्या कॅबिनेट मिशनच्या शिफारशीनुसार घटना परिषद तयार करण्याचे ठरले.
- देशरुपी व्यवस्था चालवण्यासाठी आखलेली नियमावली म्हणजे राज्यघटना किंवा संविधान होय.
- राज्यघटना तयार करताना देशाच्या संस्कृतीचा व गरजांचा विचार केला जातो. म्हणजेच शेकडो वर्षांच्या प्रथा – परंपरा (देशाची राजकीय, सामाजिक, आर्थिक) यांचा विचार केला जातो.
- भारताचे संविधान तयार करत असताना मागील २०० वर्षांच्या प्रथा परंपरांचा विचार केला आहे. या सर्व बाबींमुळे भारतीय संविधान आज जगातील सर्वात श्रेष्ठ संविधान मानले जाते.
- भारताच्या राज्यघटनेत संघराज्य असा प्रयोग नाही तर राज्यांचा संघ असा प्रयोग केला जातो.

## ❖ हंगामी सरकारची स्थापना :-



- दुसऱ्या महायुध्दानंतर इंग्लंडमध्ये निवडणूका झाल्या व विस्टन चर्चिल यांच्या जागेवर क्लेंमट ॲटली यांचे सरकार आले. पंतप्रधानपद स्विकारल्यानंतर मार्च १९४६ मध्ये क्लेमंट ॲटली यांनी भारताविषयी धोरण स्पष्ट करुन भारताला लवकरच स्वातंत्र्य देण्यात येईल अशी घोषणा केली.
- ॲटलींच्या घोषणेनुसार भारतीय नेत्यांशी सत्तांतराबाबत वाटाघाटी करण्यासाठी कॅबिनेट मिशन भारतात आले. कॅबिनेट मिशन भारतात आले.
- कॅबिनेट मिशनच्या योजनेनुसार तत्कालिन व्हॉईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी २ सप्टेंबर १९४६ रोजी पं. जवाहरलाल नेहरु यांच्या नेतृत्वाखाली ‘हंगामी सरकारची’ स्थापना केली.

❑ **हंगामी सरकारमध्ये पुढील सदस्यांचा समावेश करण्यात आला.**

| | | | |
|---|---|---|---|
| **जवाहरलाल नेहरु** | **पंतप्रधान** | **जगजीवन राम** | **श्रम मंत्रालय** |
| **वल्लभाई पटेल** | गृहमंत्रालय, सूचना व प्रसारण मंत्रालय | **लियाकत अली खान** | अर्थ मंत्रालय |
| **बलदेव सिंह** | रक्षा मंत्रालय | **आय.आय.चुन्दरीगर** | वाणिज्य मंत्रालय |
| **राजेंद्र प्रसाद** | कृषी व खाद्य मंत्रालय | **जोगेंद्र अली खान** | आरोग्य मंत्रालय |
| **जॉन मथाई** | उदयोग मंत्रालय | **सी. राजगोपालाचारी** | शिक्षण |
| **सी.एच.भाभा** | कार्य, खान व बंदरगाह | **अब्दुल आर नश्तर** | संचार मंत्रालय |
| **आसफ अली** | रेल्वे मंत्रालय | **जी.एन.मंडळ** | विधी मंत्रालय |

- प्रथमत : मुस्लीम लीगने हंगामी मंत्रिमंडळावर बहिष्कार टाकला. मात्र लॉर्ड वेव्हेल यांनी मध्यस्थी करुन मुस्लीम लीगचे मन वळविण्याचा यशस्वी प्रयत्न केल्यामुळे मुस्लीम लीगने हंगामी मंत्रिमंडळात भाग घेतला. लियाकत अली खानांसह पाच मुस्लीम लीगच्या सदस्यांची हंगामी मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★

# प्रकरण २.
# राज्यघटनेची निर्मिती

## ➢ भारतीय संविधानाचा उगम :

- २६ जानेवारी १९३० या दिवशी स्वातंत्र्य चळवळीतील अनेक नेत्यांनी एकत्र येऊन पूर्ण स्वातंत्र्याची मागणी पहिल्यांदा केली होती. त्यामुळे २६ जानेवारी या दिवसाचे महत्व लक्षात घेऊन, २६ जानेवारी १९५० पासून राज्यघटनेची अंमलबजावणी करण्याचे ठरले.

## ➢ स्वातंत्र्यपूर्व परिस्थिती:-

- स्वातंत्र्य काळात भारतीयांसाठी ब्रिटिश सरकार कायदे करीत होते. त्या कायदयांसाठी जनतेची संमती घेतली जात नव्हती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताची शासनव्यवस्था कशी असावी हे ठरविणारी भारतीय प्रतिनिधीचीच घटना समिती असावी अशी मागणी काँग्रेसने सातत्याने केली होती.
- १९४२ मध्ये ‘क्रिप्स मिशन’ पाठवून ब्रिटिश सरकारने घटना समितीची मागणी तत्वत: मान्य केली, पण मिशनचा प्रस्ताव काँग्रेस व मुस्लीम लीगने नाकारला. लोकनियुक्त घटना समितीची कल्पना सर्वप्रथम ‘मानवेंद्रनाथ रॉय’ यांनी सायमन कमिशनपुढे मांडली.
- १९३३ ब्रिटिश सरकारने काढलेल्या श्वेतपत्रिकेला विरोध करुन ‘लोकनियुक्त घटनासमिती’ हा एकमेव समाधानकारक पर्याय असल्याचा निर्वाळा राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यकारिणीने दिला. पुढे फैजपूर येथील अधिवेशनात ८ डिसेंबर १९३६ रोजी पहिल्यांदा घटना समिती निर्माण करण्यासंबंधीचा ठराव राष्ट्रीय सभेने संमत केला. पुढे ८ ऑगस्ट १९४० रोजी गव्हर्नर जनरल लॉर्ड लिनलिथगो यांनी भारताच्या संविधानिक स्थितीबाबत ‘AUGUST OFFER’ म्हणून ओळखली जाणारी घोषणा केली व राज्यघटना तयार करण्याचा भारतीयांचा हक्क या घोषणेने प्रथमच मान्य केला.

| वर्षे नेता / योजना | मागणी / घडामोडी |
|---|---|
| १९२२ - म. गांधी | भारतीय राज्यघटना ही भारतीय लोकांकडून बनवली जावी. |
| १९२८ नेहरु रिपोर्ट | या नुसार मोतीलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली संविधानाची तत्त्वे निश्चितीकरता कमिटी स्थापन झाली. |
| १९३४ - एम. एन. रॉय | हे पहिल भारतीय आहेत ज्यांनी प्रथम घटना समितीची संकल्पना मांडली. |
| १९३५ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | मानवेंद्रनाथ रॉय यांच्या शिफारशी नुसार प्रथमच राष्ट्रीय काँग्रेसने घटना समितीचा ठराव मांडला. |
| १९४० - ऑगष्ट संधी | ब्रिटिशांनी प्रथमच भारतीय राज्यघटनेच्या निर्मिती च्या तरतुदी काही अंशी मंजूर केल्या. |
| १९४२ क्रिप्स योजना | या योजनेद्वारे दुसऱ्या महायुद्धानंतर संविधान सभा निर्माण केली जावू शकतो असे आश्वासन दिले. |
| १९४६ - त्रिमंत्री योजना | या नुसार भारतीय घटना समिती तयार झाली व घटना निर्मितीस प्रारंभ झाला. |

## ➢ कॅबिनेट मिशन (१९४६)



- या योजननेचा उल्लेख शिष्टमंडळातील मंत्रींचा संख्येवरुन त्रिमंत्री योजना व ते तिघेही कॅबिनेट दर्जाचे मंत्री होते म्हणून त्याचा उल्लेख कॅबिनेट मिशन योजना असा केला जातो या त्रिमंत्री योजनेत पुढील तिघांचा समावेश होता.

१) लॉर्ड पॅथिक लॉरेन्स - अध्यक्ष – भारतमंत्री
२) सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स - अध्यक्ष – भारतीय व्यापार मंडळ
३) ए व्ही ॲलेक्झांडर – (आरमार प्रमुख)

- १६ मे १९४६ रोजी कॅबिनेट मिशनने आपला अहवाल सादर केला.

१) भारतात संघीय सरकारची स्थापना करावी.
२) संघराज्यकरिता स्वतंत्र कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ निर्माण करण्यात यावे.
३) ३८९ सदस्य असणारी संविधान सभा निर्माण करावी.
४) भारताची फाळणी करु नये व संविधान लागू होई पर्यंत हंगामी सरकारची स्थापना करावी.

- घटना परिषद निर्माण करण्याची महत्वाची तरतूद या योजनेत असल्याने अन्य त्रुटींकडे दुर्लक्ष करुन काँग्रेसने या योजनेला मान्यता दिली तसेच स्वतंत्र पाकिस्तानची मागणी जरी मान्य करण्यात आलेली नसली तरी त्यादृष्टीने अनुसरुन पुढे २ सप्टेंबर १९४६ मध्ये हंगामी सरकारची स्थापना करण्यात आली.

## ➢ संविधान सभेची रचना :-

- एकूण सदस्य - ३८९
- ब्रिटीश भारतीय प्रांतातून निर्वाचित प्रतिनिधी - २९२

- एकूण सदस्य - ३८९
- ब्रिटीश भारतीय प्रांतातून निर्वाचित प्रतिनिधी - २९२
- भारतीय संस्थानातून प्रतिनिधी - ९३
- चीफ कमिशनर क्षेत्रातून प्रतिनिधी - ४

{०४ - ब्रिटिश हॉयकमिशरचे क्षेत्र (अजमेर - मारवाड, बलुचिस्तान, कुर्ग,दिल्ली Triks - A, B,C, D)}

- निवडणूका - अप्रत्यक्ष (First Past the Post) – १० लाखामागे एक प्रतिनिधी
- तीन गटात मतदार संघ – १) शीख, २) मुस्लिम, ३) सामान्यवर्ग
- भारत – पाक फाळणीनंतर संविधान सभेतून मुस्लीम लीगला वगळण्यात आले म्हणून सदस्यांची संख्या – ३८९ वरुन २९९ (प्रांतातून – २२९ आणि संस्थानातून – ७०) वर आली.

अ - मद्रास U. P. (संयुक्त प्रांत) मध्य प्रांत, बॉम्बेए विहार, व ओरिसा
ब - पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत (बलुचिस्तान - हा प्रांत नव्हे) हायकमिशनर क्षेत्र
क - आसाम व बंगाल.
भाग 'ब' नुसार - कॅबीनेट मिशनने जरी वेगळा पाकिस्तानची मागणी नाकारली असली तरी फुटीचे राजकारण दिसते आहे.

## ➢ निर्मिती प्रक्रिया :–

१) जुलै १९४७ मध्ये घटना परिषदेच्या निवडणूका झाल्या. या निवडणूकीमध्ये राष्ट्रीय सभेच्या प्रांतिक विधीमंडळात नेहरुंच्या गटाला बहुमत मिळाले (२०८ जागा)
२) ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घटनासमितीचे स्थायी अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर १३ डिसेंबर, १९४६ रोजी जवाहरलाल नेहरुंनी भारतासाठी 'सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक' राज्यघटना तयार करण्यात यावी अशाप्रकारची उद्देशपत्रिका असलेला ठराव मांडला.
३) १९ डिसेंबर १९४६ पर्यंत म्हणजे सहा दिवस या ठरावावर चर्चा झाली व २२ जानेवारी १९४७ रोजी घटना समितीच्या सदस्यांनी या ठरावाला मान्यता प्रदान केली.घटना समितीमध्ये एक मसूदा समिती व इतर ११ उपसमित्या स्थापन केल्या.
५) मसुदा समितीची निर्मिती नेहरुंच्या प्रांतिक मंडळाने केली.
६) संपूर्ण संविधान कसे असावे याचा आराखडा तयार करण्यासाठी मसुदा समिती नेमली.

| प्रथम | द्वितीय |
|---|---|
| ९ डिसेंबर १९४६ | ११ डिसेंबर १९४६ |
| सच्चिदानंद सिन्हा | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| फ्रँक अन्थोनी | एच. सी. मुखर्जी, बी. एन. राव |

# घटना निर्मितीसाठी समित्या

## ➢ प्रारुप समिती / मसुदा समिती :-

- डॉ. बाबासाहेबांची नियुक्ती १९४६ च्या जुलै महिन्यात घटनासमितीसाठी निवडणूका झाल्या होत्या. त्यावेळी कोणता भूप्रदेश भारतात राहणार व कोणता पाकिस्तानात जाणार हे निश्चित झाले नव्हते निवडणुका सर्वच प्रदेशात झाल्या होत्या.
- पुढे पाकिस्तानात गेलेला प्रदेश निश्चित झाल्यानंतर त्या प्रदेशातून घटनासमितीवर निवडून आलेल्या प्रतिनिधींचे सभासदत्व रद्द झाले. त्यात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा एकप्रतिनिधी आणि तेव्हाच्या शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश होता.
- यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीचे सभासद राहिले नव्हते. कालांतराने महाराष्ट्रातून घटना समितीवर काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून निवडून गेलेले बॅ. जयकर हे पुणे विद्यापिठाचे कुलगुरु म्हणून निवडले गेले.
- त्यामुळे त्यांची घटना समितीवरील जागा रिकामी झाली. त्यानंतर महात्मा गांधीच्या सूचनेवरुन काँग्रेसने बॅ. जयकारांच्या जागी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नेमणूक केली. अशा रितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीचे सभासद झाले.

## ➢ मसुदा समिती :-

❑ **सर्वात महत्त्वपूर्ण समिती :**

- स्थापना : २९ ऑगस्ट १९४७ [SHORT TRICK]
- अध्यक्ष : डॉ. बाबासाहेब आंबेडकर (मुंबई प्रांत) A
- सदस्य :
  १) अय्यंगार गोपालस्वामी (माजी पंतप्रधान – जम्मु काश्मिर) A
  २) अय्यर कृष्णस्वामी (महाधिवक्ता मद्रास प्रांत) A
  ३) खेतान डी.पी. (खेतान उद्योगसमूह व वकील) K
  ४) के.एम. मुन्शी (माजी गृहमंत्री – मुंबई प्रांत) K
  ५) मोहम्मद सादूल्ला (आसाम प्रांतचे मुख्यमंत्री, मुस्लीम लिग सदस्य) M
  ६) मित्तर बी.एन. (माजी महाधिवक्ता – भारत) M

❑ **दोन बदल :**

१) खेतान डी.पी. यांच्या मृत्यूमुळे त्या जागी कृष्णाम्माचारी टी.टी. (एकमेव सदस्य जे कायदेतज्ञ नव्हते.)

२) मित्तर बी.एन. यांचा राजीनामा त्या जागी माधवराव एन. (वडोदरा संस्थानचे कायदेविषयक सल्लागार)

## ➢ घटना समितीतील महत्त्वपूर्ण समित्या

| क्र. | समिती | अध्यक्ष |
|---|---|---|
| १ | जवाहरलाल नेहरु | १) केंद्र सत्ता समिती २) केंद्रासाठी संविधान समिती |
| २ | | ३) केंद्र व राज्य समिती (समझोता) |
| ३ | | ४) संस्थाने विचार विनिमय समिती |
| ४ | सरदार वल्लभभाई पटेल | प्रांतीय संविधान समिती |
| ५ | सरदार वल्लभभाई पटेल | मुलभूत हक्क समिती व अल्पसंख्यांक समिती<br>A] मुलभूत हक्क उपसमिती - अध्यक्ष जे. बी. कृपलानी<br>(आंबेडकर व राजकुमारी अमृता कौर, हंसाबेन मेहता सदस्य)<br>B] अल्पसंख्यांक उपसमिती - अध्यक्ष एच. सी. मुखर्जी |
| ६ | डॉ. राजेंद्रप्रसाद | १) प्रक्रिया नियम समिती २) वित्त व कर्मचारी समिती |
| ७ | डॉ. राजेंद्रप्रसाद | ३) राष्ट्रध्वजासाठी अस्थायी समिती |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | मसुदा समिती |
| | **इतर समित्या** | |
| १ | गणेश वा. मावळणकर | संविधान सभेच्या कामकाज समिती |
| २ | डॉ. राजेंद्रप्रसाद (आयोगानुसार) | सुकाणू समिती |
| ३ | पट्टाभिसीतारमैय्या | सभागृह समिती |
| ४ | डॉ. राजेंद्रप्रसाद | राष्ट्रध्वज समिती (तदर्थ) |
| ५ | <br><br>गोपीनाथ बरदोई<br>ए. व्ही. ठक्कर | मुलभूत अधिकार व अल्पसंख्यांक समिती (बहिष्कृत क्षेत्रासाठी)<br>A] उत्तर-पूर्व सिमांत<br>B] इतर सोडलेले क्षेत्र (आसाम सोडून) |

**घटना समितीचे सदस्य नसलेल्या समित्या** -

१) वरदचारी श्रीनिवास - १) नागरिकत्व बद्दल अस्थायी समिती

२) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश २) सर्वोच्च न्यायालयाबद्दल हंगामी समिती

३) नलिनी रंजन सरकार ३) घटनेमधील आर्थिक तरतुदी संदर्भातील तज्ञ समिती

४) भाषावर प्रांत रचना संदर्भात समिती - एस. के. दार निवृत्त न्यायाधीश अहलाबाद उच्च न्यायालय

## ➢ घटनेबद्दल इतर माहिती




घटना समिती चिन्ह

- घटनेची प्रस्तावना – पं. जवाहरलाल नेहरु
- घटनेची गुरुकिल्ली - उद्देशपत्रिका(सरनामा) होय.
- राज्यघटना निर्मितीसाठी ६३ लाख ९६ हजार ७२९ रु. इतका खर्च आला.
- २००९ मध्ये या वर्षी भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीस ६० वर्षे पुर्ण झाली.
- कायदेविषयक सल्लागार म्हणून बी.एन. राव यांची नियुक्ती करण्यात आली. नंतर ते पहिले भारतीय आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश बनले. (१९५०)
- घटना समितीचे उद्दिष्ट नेहरुंनी १३ डिसेंबर १९४६ रोजी मांडला व तो ठराव २२ जाने. १९४७ रोजी मंजूर झाला.
- १९१९ च्या अमृतसरच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात भारताची घटना तयार करण्याची मागणी मांडली गेली. सर्व पक्षांचे प्रतिनिधीत्व असलेले १९२८ मध्ये घटनेची योजना तयार करण्यात आली. (नेहरु रिपोर्ट)
- ९ डिसेंबर १९४६ ते १४ ऑगस्ट १९४७ या दरम्यान घटना समितीची पाच अधिवेशने झाली व त्यानंतर सहा अधिवेशने अशी एकूण ११ अधिवेशने झाली.
- सरनाम्यातील पाच शब्द – सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणतंत्र.
- राज्यघटनेच्या अंतिम आराखडयात ३९५ कलमे व ८ परिशिष्टे होती.
- सद्यस्थिती – ४४८ कलमे, १२ परिशिष्टे, २५ विभागात विभागले आहेत.
- घटना निर्मितीचा कालावधी – १०८२ दिवस २ वर्ष, ११ महिने, १८ दिवस

- २६ नोव्हेंबर १९४९ ला भारताचे संविधान समितीकडून स्वीकृत केले गेले.
- शेवटचे अधिवेशन १४ नोव्हेंबर – २६ नोव्हेंबर १९४९ ला होते. (२८४ सदस्य उपस्थित होते.)
- २६ नोव्हेंबर, १९४९ पर्यंत संविधान सभेची ३ वाचने झाली. याच दिवशी डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यावर स्वाक्षरी केली व २४ जानेवारी १९५० रोजी इतर सर्व सदस्यांनी स्वाक्षरी केली नेहरु पहिले रोमन सर्वात शेवटची स्वाक्षरी फिरोज गांधी यांची आहे. व ती इंग्रजी व देवनागरी हिंदीमध्ये आहे. २८४ सदस्य उपस्थित होते.
- २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटना अंमलात आली.
- सद्यस्थितीत भारतीय घटनेत ३९५ कलमे, १२ परिशिष्टे आणि २२ विभाग अंतर्भूत आहेत. परिणामी भारताचे संविधान विस्तृत बनले. (राज्यघटनेत गेल्या ६० वर्षांत घटनादुरुस्तीद्वारे ज्या कलमांचा समावेश केलेला आहे, त्यांचा उल्लेख ३९५ पुढील कलमे असा केला जात नाही. तर त्या सर्व तरतुदी मूळच्या ३९५ कलमांमध्येच समाविष्ट केलेल्या किंवा वगळण्यात आल्या आहेत. त्यामुळे सध्या राज्यघटनेत ३९५ कलमे आहेत असे म्हणता येते.)

**❑ महत्त्वाचे :-**

१) राज्यघटना ही प्रेमबिहारी नारायण रायजादा यांचे हस्ताक्षर आहे.
२) नंदलाल बोस, बी.आर. सिन्हा यांनी मुळ प्रतीस नक्षीकाम करुन आपला सांस्कृतिक इतिहास दाखविला आहे.
३) हिंदी भाषेत हस्तलिखित वसंत किशन वैघ तर नक्षीकाम नंदलाल बोस यांचे आहे.

## ➢ संविधान सभा व संविधान सभेचे कामकाज:-



- घटना परिषदाचे कामकाज २ वर्षे ११ महिने व १८ दिवस चालले.
- परिषदेच्या एकूण ११ अधिवेशनात मिळून १६५ बैठका झाल्या.
- घटनेचे तीन वेळा वाचन करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | **प्रथम वाचन** | **: ४ ते ९ नोव्हेंबर १९४८** |
| २) | **द्वितीय वाचन** | : १५ नोव्हेंबर १९४८ ते १७ ऑक्टोबर १९४९ |
| ३) | **तृतीय वाचन** | : १४ नोव्हेंबर १९४९ ते २६ नोव्हेंबर १९४९ |

- २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेची स्विकृती करण्यात आली. मूळ घटनेत २२ भाग, ३९५ कलमे व ८ परिशिष्टे होती. घटनेचा अंमल २६ जानेवारी १९५० पासून सुरु झाला कारण, १९२९ च्या लाहोर अधिवेशनात पंडित नेहरुंच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मान्य करुन २६ जानेवारी १९३० हा भारताचा प्रथम स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचे ठरले होते. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी १९५० पासून घटनेचा अंमल सुरु झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| १) नागरिकत्वाशी संबंधित | ५, ६, ७, ८,९ | ५) लघु शीर्षक | ३७९, ३८० |
| २) निवडणूक संबंधित | ६० | ६) घटनेच शीर्षक तरतूद (शीर्षक - Constitution of India) | ३८८ |
| ३) तात्पुरत्या संसद तरतूद | ३२४ | ७) निवडणूक आयोगाची स्थापना | (Election Commission) |
| ४) तात्पुरत्या तरतुदी | ३६६, ३६७ | ८) राष्ट्रपती शपथ तरतूद | ३९१, ३९२, ३९३ |

### ❑ अशा खालील पंधरा महिलांनी घटना समितीत काम केले:-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **सरोजिनी नायडू (बिहार)** | ९ | **दक्षिणायनी वेलायुधन (मद्रास)** |
| २ | हंसा मेहता (बॉम्बे) | १० | कमला चौधरी (संयुक्त प्रांत-सध्या उ. प्र.) |
| ३ | दुर्गाबाई देशमुख (मद्रास) | ११ | लीला रॉय (पश्चिम बंगाल) |
| ४ | राजकुमारी अमृत कौर (मध्य/बेरार) | १२ | सुचेता कृपलानी (संयुक्त प्रांत-सध्या उ. प्र.) |
| ५ | अम्मू स्वामिनाथन (मद्रास) | १३ | बेगम ऐझाझ रसूल (मुस्लिम लिगची प्रतिनिधी, १९५२ मध्ये राज्यसभेवर निवड) (संयुक्त प्रांत-सध्या उ. प्र.) |
| ६ | पूर्णिमा बॅनर्जी (संयुक्त प्रांत-सध्या उ. प्र.) | १४ | रेणूका रे (पश्चिम बंगाल) (मार्गदर्शक नियुक्ती) |
| ७ | विजयालक्ष्मी पंडित (संयुक्त प्रांत-सध्या उ. प्र.) | १५ | मालती चौधरी (ओरिसा) |
| ८ | ॲनी मस्कहरान्स (त्रावणकोर / कोचीन) | | |

## ❖ दुर्गाबाई देशमुख –

❖ भारतीय राज्यघटना मसुदा समितीवर त्यांची निवड मद्रास प्रांताच्या प्रतिनिधी म्हणून झाली होती. राज्यघटना मसुदा समितीतील अध्यक्षीय मंडळावर त्या एकमेव स्त्री सदस्या होत्या. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढलेत. "हियर इज द वूमन ह हॅज बी इन हर बोनेट" ( म्हणजेच एखाद्या विषयाचा चिवटपणे आणि अथक प्रयासाने पाठपुरावा करणारी स्त्री व्यक्ती). अनामिक कारणांमुळे संविधान समितीतील रिक्त झालेल्या जागा भरण्यासाठी असलेल्या नियमात त्यांनी बदल सुचविले.

❖ त्यांनी कलम ३१ (५) [ सध्याचे कलम ३९( फ) ] संबंधी चर्चा करीत असताना लहान मुले व युवकांच्या शोषण मुक्तीसाठी आणि त्यांच्या अधिकार अंमलबजावणीसाठीच्या यंत्रणेबाबत साशंकता व्यक्त केली. अशा नाजूक व महत्त्वपूर्ण विषयाला केवळ मार्गदर्शक तत्त्वांतर्गत अंतर्भूत करणे परिणामकारक होणार नाही हे जाणून त्या म्हणतात, " वनचर प्राणी आणि पक्षी यांच्यासारखे विषय जर घटनेतील सातव्या अनुसूचित सूचीभूत होऊ शकतात तर 'निराधार मुले आणि युवक' यांच्या संरक्षण आणि शोषण मुक्तीचा विषय समवर्ती सूची किंवा इतर सूचित का असू नये? फक्त खासगी संस्थांवर अवलंबून राहून या विषयांकडे बघणे योग्य नाही. राज्य शासनाकडेसुद्धा या विषयावर योग्य ते कायदे करण्याची संवैधानिक क्षमता असणे आवश्यक आहे. आजतागायत या विषयाला सातव्या सूचित स्थान मिळाले नाही. मात्र त्यांचा हा विचार ४२व्या घटना दुरुस्तीनंतर कलम ३९ (फ) मध्ये प्रतिबिंबित होताना दिसतो.

❖ संघराज्य पद्धतीत त्या मजबूत केंद्राच्या समर्थक होत्या. त्यामुळेच राज्यपालांची नेमणूक थेट निवडणूक पद्धतीने न करता राष्ट्रपतींनी करावी, असे त्यांनी सुचविले होते. राज्यपालांच्या नियुक्त्यांमध्ये राजकारण नसावे आणि राज्यपालांनी निष्पक्षपातीपणे कार्य करून केंद्र व राज्यांमध्ये दुव्याचे काम करावे. हा त्यांचा विचार आजही समर्पक आहे.सर्वोच्च व उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशांच्या नियुक्त्याबाबत चर्चा करीत असताना त्यांचे स्पष्ट मत होते की न्यायाधीश हे भारतीय नागरिकच असावे आणि ही बाब संविधानात नमूद करावी. ही दुरुस्ती समितीने मान्य केली. संविधानाच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची आहे.

❖ न्यायालयाने आपल्या न्यायनिवाडय़ाद्वारे लोकांच्या आशा आकांक्षांना जपले पाहिजे. सध्याच्या कलम ३२ वर चर्चा करीत असताना त्यांनी सुचविले की एखादी याचिका ( रिट पिटीशन) जर उच्च न्यायालयाने कलम २२६ खाली फेटाळली तरी ती याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करता येईल, अशा याचिका कायद्याच्या रेस ज्युदिकेटासारख्या तांत्रिक बाबीमुळे नाकारू नये. एक निष्णात वकील म्हणून संविधान समितीच्या कामकाज प्रक्रियेबद्दलचे त्यांनी सुचविलेले बहुतांश नियम मान्य करण्यात आले होते.

❖ राष्ट्रभाषेबद्दल चर्चा करीत असताना संस्कृत प्रभावित हिंदीऐवजी हिंदुस्तानी हिंदी राष्ट्रभाषा असावी, असा आग्रह त्यांनी केला होता. चित्रपट प्रदर्शना संबंधीचे सर्व अधिकार केंद्राकडे असावे जेणेकरून भारतीय चित्रपटांचा सांस्कृतिक व सामाजिक दर्जा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावला जाईल, असे त्यांचे मत होते. आणिबाणीच्या परिस्थितीत राष्ट्रपतींकडे सर्व राज्यांच्या आर्थिक नियोजनासंबंधी अधिकार असावे हे ही त्यांनी सुचविले होते.

❖ सध्याच्या कलम २५ (२) ब मध्ये त्यांची उलेखनीय दुरुस्ती प्रतिबिंबित होते. त्या कलमाच्या भाषेवर चर्चा करीत असताना, या कलमात 'कुठल्याही' शब्दाऐवजी 'सर्व' शब्द त्यांनी त्या कलमांतर्गत अधिकाराची व्याप्ती वाढविण्यासाठी सुचविला होता. आता ते कलम असे आहे की, 'सर्व समुदायांच्या किंवा वर्गांतील व्यक्तींना सार्वजनिक धार्मिक स्थळे व मंदिरांत मुक्त प्रवेश असावा'. घटनेची अंमलबजावणी करीत असताना सर्व राज्य संस्थांनी व्यक्तीहितापेक्षा जनहिताला प्राथमिकता द्यावी, हे त्यांच्या वेळोवेळी राज्यघटना समितीच्या समोर केलेल्या भाषणात आढळते.

## ❖ बेगम रसूल –

❖ राज्यघटना समितीतील या एकमेव आणि प्रथम मुस्लीम सदस्य होत. त्या मुस्लीम लीगच्या नेत्या होत्या. तसेच राज्यघटना समितीच्या अल्पसंख्याकांचे अधिकार मसुदा समितीच्याही सदस्य होत्या. घटना समितीत त्या उत्तर प्रांताच्या प्रतिनिधी म्हणून निवडून आल्या होत्या. मुस्लीम धर्माच्या आधारावर संसदेत राखीव जागा असण्याच्या आग्रह धरण्यापासून अनेक बडय़ा मुस्लीम नेत्यांना परावृत्त करून, त्यांनी स्वतचे नेतृत्व कौशल्य सिद्ध केले.

❖ त्यांनी राज्यघटना मसुदा समितीसमोर म्हटले की, ' धर्माच्या आधारावर एखाद्या व्यक्तीची देशनिष्ठा ठरविणे योग्य नाही. विशेषत मुस्लीम व्यक्तीच्या देशनिष्ठेवर बोट ठेवणे योग्य होणार नाही. राज्यघटनेच्या पहिल्या मसुद्याचे विवेचन करताना त्यांनी विविध मुद्दे हाताळले. मुख्य म्हणजे मसुद्यात लिंगाच्या आधारे भेदभाव करणे बेकायदेशीर असण्याबाबतचे कलम नसल्याची खंत व्यक्त केली होती. तसेच अल्पसंख्याकांना पुरेसा वेळ न देता हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून लादू नये, असे व्यावहारिक मतही मांडले होते आणि मुस्लीम बांधवांना योग्य वेळ दिल्यास ते देवनागरीतील हिंदी भाषा आत्मसात करतील हा विश्वासही दर्शविला होता. साम्यवादाला प्रखर विरोध करीत, लोकशाहीला प्राथमिकता देणाऱ्या राष्ट्रसंकुलातील (कॉमनवेल्थ) भारताच्या सदस्यत्वाला त्यांनी पाठिंबा दिला.

- मुस्लीम लीगसारख्या पक्षाचे प्रतिनिधित्व करीत असूनसुद्धा त्यांचे भारतीय काँग्रेस संबंधीचे मत, त्यांच्याठायी असलेली धर्मनिरपेक्षता व देशनिष्ठा ठळकपणे दाखविते. संविधानाच्या कलम ६६ (सध्या कलम ७९) मध्ये त्यांनी 'संसद' शब्दाऐवजी 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' हा पर्याय सुचविला होता. त्यामागचे कारण देताना त्या म्हणाल्या की 'असे केले तर देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील काँग्रेस पक्षाचे योगदान फक्त भारतीयाच्याच नाही तर पूर्ण जगाच्या स्मृतीत कोरले जाईल.
- संसदेत मंजूर झालेल्या विधेयकाला राष्ट्रपतींनी संमती देताना वापरायच्या विवेकाधिकारावर अंकुश असावा अशी दुरुस्ती सुचविली ती मान्य केली गेली. आता ती तरतूद अशी आहे की, संसदेत मंजूर झालेल्या विधेयकाला राष्ट्रपती प्रथम वेळी नकार देऊ शकतात किंवा बदल सुचवून विधेयक माघारी पाठवू शकतात पण दुसऱ्या वेळी संसदेने ते विधेयक राष्ट्रपतींनी सुचविलेल्या बदलासाहित वा बदलाविना परत संमतीसाठी पाठविले तर राष्ट्रपतींना त्यांस संमती देणे बंधनकारक आहे." आजच्या काही राजकीय पक्षांच्या पराकोटीच्या प्रांत, धर्म, भाषा आणि जातीयवाद भूमिकेला आव्हान देणारे प्रगत आणि पुरोगामी विचार बेगम रसूल यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतात.

### ❖ रेणुका रे –

- यांची पश्चिम बंगाल प्रांताच्या प्रतिनिधी म्हणून निवड झाली होती. रे यांचा शिक्षणात धर्मनिरपेक्षता पाळण्याबाबत कटाक्ष होता. कलम १६ (आता कलम २८)च्या चर्चेत भाग घेताना त्यांनी 'शिक्षण क्षेत्रात शासन अनुदानित संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण घेण्याची सक्ती नसावी" असे सुचविले व ते मान्य केले गेले. चीनच्या धर्तीवर आपल्याही घटनेत वार्षकि अर्थसंकल्पात शिक्षणासाठी एक विशिष्ठ रक्कम राखून ठेवावी, असे त्यांनी सुचविले. ही मागणी आजतागायत अपूर्णच राहिली.
- भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात अमेरिकेप्रमाणे दुहेरी नागरिकत्वापेक्षा देशाच्या अखंडता व अविभाज्यतेसाठी एकल नागरिकत्वाचा स्वीकार करावा असे मत त्यांनी मांडले. अन्य सदस्यांप्रमाणेच त्यांचाही जमीनदारी पद्धतीला विरोध होता, जमीनदारीचा बीमोड करताना शासनाने हस्तगत केलेल्या जमिनीच्या मोबदल्याबाबत कोणालाही न्यायालयात जाब विचारता येणार नाही या तरतुदीची मागणी केली होती.
- त्यांचा द्विसदनीय विधान मंडळाला विरोध होता कारण त्यांच्या मते या प्रणालीमुळे पसा आणि वेळ या दोहोंचाही अपव्यय होईल. तसेच पृथक निर्वाचन (सेपरेट इलेक्टोरेट) पद्धतीलाही त्यांनी प्रखर विरोध केला. काही विशिष्ट समूहाच्या लोकांसाठी राजकीय आरक्षण हे अपवादात्मकच असावे हे त्यांचे ठाम मत होते.
- कलम १३(आता कलम २३) मधील श्री दास यांनी सुचविलेल्या दुरुस्तीच्या चर्चेवेळी भाष्य करताना त्या म्हणाल्या, "देवदासी व वेश्यावृत्ती या देशातील भीषण सामाजिक समस्या आहेत. यांचे निर्मूलन करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न झाले पाहिजे, पण या समस्यांचा घटनेत उल्लेख करणे तेवढेसे सयुक्तिक नाही."

### ❖ हंसा मेहता –

- या मुंबई प्रांताच्या प्रतिनिधी होत्या. त्या भारतीय राज्यघटना समितीतील एक सक्रिय, प्रखर स्त्रीवादी सदस्य होत्या. त्या मूलभूत अधिकार उपसमिती, सल्लागार समिती, प्रांतीय संविधान समिती आणि राष्ट्रध्वज समितीच्या सदस्या होत्या. १९४८ मध्ये त्यांनी 'भारतीय स्त्रियांचे अधिकार व कर्तव्ये'संबंधी मसुदा सादर केला होता. या मसुद्याचा प्रभाव संयुक्त राष्ट्र संघाने मंजूर केलेल्या १९४८ च्या मानवाधिकार जाहीरनाम्यात दिसतो.
- त्यांची भारतीय राज्यघटना मसुदा समितीसमोरील महत्वपूर्ण मागणी म्हणजे 'समान नागरी कायदा' हा मूलभूत अधिकाराचाच अविभाज्य भाग असावा ही होय. या मागणीला मूलभूत अधिकार समितीने दुजोराही दिला, पण काही बड्या नेत्यांच्या विरोधामुळे व सल्लागार समितीने ठाम भूमिका न घेतल्याने मेहता यांची निराशा झाली. काही सदस्यांच्या या भूमिकेमुळे आजही 'समान नागरी कायदा' ही भारताच्या राजकीय पटलावरील भळभळणारी जखम आहे.वेळोवेळी राज्यघटना समितीसमोरच्या भाषणांतून आपल्याला जाणवते की त्या स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाला अग्रक्रम देत. त्यांनी स्पष्टपणे स्त्री आरक्षणाचा विरोध केला. उद्दिष्टाच्या चर्चेत त्या म्हणाल्या की, "स्त्रियांना विशेष सवलती व आरक्षणापेक्षा सामाजिक, आथक आणि राजकीय न्यायाची अपेक्षा आहे.
- कोणत्याही प्रवर्गासाठी आरक्षणाची सोय ही लोकशाहीला धार्जिणी नाही. पंडित नेहरूंनी त्यांची शिफारस केल्यानंतर त्यांची निवड संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवाधिकार समितीवर झाली. तिथेही त्यांनी इतिहास रचला. मानवाधिकार जाहीरनाम्यावरील चर्चेत 'सर्व पुरुषांना जन्मत: स्वतंत्र आणि समानतेचा अधिकार असतो" (मॅन आर बॉर्न फ्री अँड इक्वल ) या कलमाऐवजी 'सर्व व्यक्तींना जन्मत: स्वातंत्र आणि समानतेचा अधिकार असतो" असे सुचविले व ते मान्य करण्यात आले.

### ❖ राजकुमारी अमृत कौर –

- या सी पी आणि बेरार प्रांताच्या प्रतिनिधी होत्या. राज्यघटना समिती स्थापित 'अर्थ आणि कर्मचारी', व 'राष्ट्रध्वज समितीच्या' त्या सदस्या होत्या. रेणुका रे आणि बेगम रसूल यांच्यासोबत त्यांनीही पृथक निर्वाचन (सेपरेट इलेक्टोरेट) पद्धतीला प्रखर विरोध केला. आपला राष्ट्रध्वज फक्त खादी कापडाचा व हातांनी विणलेल्या सुताचा असावा, हा त्याचा आग्रह संविधान समितीने मान्य केला. त्या स्वतंत्र भारताच्या प्रथम आरोग्यमंत्री होत्या.

### ❖ दक्षयानी वेलुयुदन –

- या घटना समितीतील एकमेव दलित स्त्री सदस्य होत्या. मद्रास प्रांताकडून त्यांची निवड झाली होती. महात्मा गांधीजी आणि डॉक्टर आंबेडकर यांच्या विचाराने प्रभावित होऊन, दलितांची अस्पृश्यता आणि भेदाभेदसारख्या अमानवी प्रथेतून सुटका करण्याचा ध्यास त्यांच्या मांडणीत दिसतो. त्यांच्या मते राज्यघटना समितीची भूमिका फक्त संविधान निर्मितीपुरतीच मर्यादित नसून या समितीकडून जनसामान्यांना जीवनाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन बहाल करण्याची असावी. थोडक्यात, संविधान निर्मितीसोबतच समाज परिवर्तनाचेही कार्य समितीने करावे.
- स्वतंत्र भारतात दलितांना राजकीय व इतर क्षेत्रांत आरक्षण देऊन आपण वसाहत वादाप्रमाणेच जातीच्या आधारे विभागलेले राहू व दलित समाज गुलामगिरीतून मुक्त होऊ शकणार नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. घटनेच्या दुसऱ्या मसुद्यावर चर्चा करताना त्यातील भारतीयत्वाची आणि कल्पकतेची उणीव त्यांनी अधोरेखित केली. हा मसुदा म्हणजे निव्वळ ब्रिटिशकालीन १९३५ च्या भारतीय शासन कायद्याची सुधारित आवृत्ती आहे असे त्यांनी ठासून मांडले.
- विशेषत: राज्यपाल आणि केंद्रशासित प्रदेश पद्धती या ब्रिटिश राज्य पद्धतीचे अनुकरण होय व भारतीय विविधतेला आणि सांस्कृतिक ठेव्यासाठी या गोष्टी पूरक नाहीत असे भाष्य केले. भारतीय प्रजासत्ताकात राज्यांची स्वायत्तता टिकून राहावी असे सुचविताना त्यांनी आपण सशक्त केंद्र संकल्पनेविषयी साशंक आहोत हेही सांगितले. राज्यघटनेचा मसुदा तयार झाल्यावर, स्वतंत्र भारताच्या पहिल्या निवडणुकीत तो जनमतासाठी जनतेसमोर मांडावा अशी क्रांतिकारी सूचना त्यांनी संविधान समितीला केली होती.

### ❖ पूर्णिमा बॅनर्जी –

- युनायटेड प्रोविन्सिसतर्फे त्या निवडून आल्या होत्या. शिक्षणाचा आणि रोजगाराचा अधिकार मूलभूत अधिकारांत सामील असावा, असा आग्रह त्यांनी धरला होता. त्यांचा धर्मनिरपेक्षता तत्त्वावर गाढ विश्वास होता. धार्मिक स्वातंत्र्यावरील चर्चेत बोलताना त्या म्हणाल्या की कलम १६ अंतर्गत (आता कलम २८) शासन अनुदानित शाळांत सर्व धर्मावरील मूळ तत्त्वांचे तुलनात्मक अध्ययन अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यास, विद्यार्थी सर्वधर्मसमभाव तत्त्वाला आत्मसात करतील आणि धर्म या संकल्पनेच्या संकुचित दृष्टिकोनाला आळा बसेल.
- राज्यसभेची भूमिका व उपयोगिता याबद्दल एकंदरीतच त्या साशंक होत्या. त्या म्हणतात की या सभेतील सदस्यांची नियुक्ती राजकीय वर्तुळातील हितसंबंधांच्या वा अमाप श्रीमंतीच्या आधारे होऊ न देण्याची तरतूद हवी. अन्यथा असे सदस्य देशहितासाठी केलेल्या कायद्यांच्या मंजूरी प्रक्रियेत बाधा उत्पन्न करु शकतात. ही त्यांची शंका आजच्या घडीला अत्यंत खरी ठरते आहे. प्रतिबंधक अटकेच्या संबंधांतील तरतुदीच्या चर्चेतील त्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे. संशयित व्यक्ती वा असामाजिक तत्त्वांना पूर्व अटक करण्याचा अधिकार शासनाला असावा, अशी भूमिका त्यांची होती.
- (आजचे कलम २२) मात्र या अधिकाराची अंमलबजावणी करताना शासनावर काही प्रमाणात अंकुशही असावा हा युक्तिवाद त्यांनी सुचविला होता. जसे की अशा प्रकारे अटक झालेल्या व्यक्तींना विशिष्ट कालावधीत त्याच्यावरील आरोपांची माहिती देणे, अटक मर्यादा वाढविण्यासाठी त्यांस सल्लागार समितीसमोर हजर करणे, जर त्या व्यक्तीवर कुटुंब आथकरीत्या अवलंबून असेल तर त्या कुटुंबाला आथक मदत करणे. यापकी पहिल्या दोन दुरुस्त्या मान्य करण्यात आल्या.
- राज्यघटना समितीच्या स्थापनेवेळी स्त्री सदस्यांची नगण्य संख्या लक्षात घेऊन काही अनामिक कारणांमुळे जर स्त्री सदस्याची जागा रिक्त झाली तर त्या जागेवर स्त्री सदस्याचीच नेमणूक करावी ही विनंती त्यांनीही केली होती. यासाठी त्यांनी इतर समुदायातील व धर्मातील सदस्याच्या रिक्त जागी फक्त त्याच समुदायाच्या वा धर्माच्या व्यक्तीची नेमणूक होते या नियमाचा आधार घेतला. मात्र त्यांचा हा ताकक युक्तिवाद समितीतील पुरुष सदस्यांनी अताककपणे झिडकारला. हद्द तर तेव्हा झाली जेव्हा समितीतील एक विद्वान व प्रख्यात पुरुष सदस्य कामत यांनी यावर म्हटलं, "शासन आणि प्रशासनातील नियुक्त्या करीत असताना स्त्रियांची मर्यादित कार्यक्षमता विसरून चालणार नाही.
- स्त्रियांची निर्णयक्षमता मुख्यत: बुद्धीसापेक्षतेपेक्षा भावनाप्रधान असते. कारण त्या मेंदूपेक्षा हृदयानेच विचार करतात, मात्र प्रशासकीय निर्णय घेताना भावनेपेक्षा व्यावहारिक व बुद्धीनिष्ठ विचारांची गरज असते. निर्णय थंड डोक्याने घ्यायचे असतात." या पोकळ युक्तिवादाला कोणत्याही सदस्यांनी विरोध दर्शविला नाही. डॉक्टर आंबेडकरांनी मात्र तसे अमलात आणण्याचा दिलासा देऊन, त्यासाठी नियम आवश्यक नाही, असे सांगितले.
- संविधानाच्या स्वीकृतीच्या वेळी केलेल्या भाषणात त्यांनी देशातील मौल्यवान खनिजे व महत्त्वपूर्ण उद्योगधंद्यावर सरकारी नियंत्रण असावे आणि या क्षेत्रात विदेशी संचार नसावा ही आशा व्यक्त केली. तसेच घटनेतील अभिव्यक्ती स्वातंत्र व संघटनेच्या अधिकारावर मर्यादा आणणाऱ्या तरतुदीमुळे नागरिक हतबल होऊ शकतात असे मत मांडले. आजची परिस्थिती पाहता या विचारांतील त्यांची दूरदर्शीता दिसते.

❖ **विजयालक्ष्मी पंडित –**

- या युनायटेड प्रांत प्रतिनिधी म्हणून घटना समितीत दाखल झाल्या, पण त्यांचा कार्यकाल काही महिनेच होता. कारण त्यांची रशियातील भारतीय दूत म्हणून नेमणूक झाल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला. संविधान समितीसमोर केलेल्या एकमेव भाषणात भारताला त्यांनी आंतरराष्ट्रीय पटलावर विश्वासाने उभे रहाणारे महत्त्वपूर्ण राष्ट्र असे संबोधिले. वसाहतवादातून मुक्त होऊ पाहणाऱ्या अनेक देशांतील जनतेसमोर भारतीय संविधान प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरेल असा विश्वास दाखविला.

❖ **सरोजिनी नायडू –**

- या बिहार प्रांताचे प्रतिनिधित्व करत होत्या. भारतीय राष्ट्रध्वज समितीच्या त्या अध्यक्ष होत्या. या समितीने राष्ट्रध्वजाला मान्यता दिल्यावर, ध्वज स्वीकृतीसमारोहाच्या वेळी त्यांनी भाषण केले. त्या म्हणाल्या की जाती, धर्म, स्त्री, पुरुष या आधारे देशाचे प्रतिनिधित्व करणे सयुक्तिक नाही. या समितीतील स्त्री सदस्यांनी आग्रह धरला की जास्तीत जास्त स्त्री वर्गानी भाषणे करावीत. पण मी इथे एक पुनर्जीवित आणि अविभाज्य भारतमातेची प्रतिनिधी व भारतीय म्हणून बोलत आहे. मात्र सरोजिनी यांच्या अकाली निधनामुळे त्यांचे कार्य अधुरेच राहिले.

❖ **मालती चौधरी –** उत्तर प्रदेशच्या या प्रतिनिधी होत्या. भारतातील बहुतांशी स्त्रिया अंधश्रद्धाळू असल्यामुळे त्यांना सोसावा लागणारा सामाजिक त्रास याविषयी सुधारणा करण्यासंबंधी त्या नेहमी प्रयत्नशील असत.

❖ **लीला रॉय –** या बंगाल प्रांताचे प्रतिनिधित्व करीत होत्या. त्या राज्यघटना मसुदा समितीत फार काळ रमल्या नाहीत. भारताच्या विभाजनामुळे व्यथित होऊन, त्या निषेधार्थ सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

➢ **अधिवेशन**

| अधिवेशन | कालावधी |
|---|---|
| पहिले | १३ डिसेंबर ते २३ डिसेंबर, १९४६ |
| दुसरे | २० जानेवारी ते २५ जानेवारी, १९४७ |
| तिसर | २२ एप्रिल ते ३१ जुलै, १९४७ |
| चौथे | १४ जुलै ते ३१ जुलै, १९४७ |
| २२ जुलै, १९४७ संविधान सभेद्वारे भारतीय राष्ट्रध्वजाला मान्यता. | |
| पाचवे | • १४ ऑगस्ट, १९४७ रोजी ५ वे अधिवेशन सुरु<br>• २९ ऑगस्ट, १९४७ – डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसूदा समितीची स्थापना. |
| स्वातंत्र्यानंतर | |
| सहावे | ४ नोव्हेंबर ते १३ डिसेंबर, १९४८ |
| सातवे | २७ डिसेंबर, १९४८ ते ८ जानेवारी, १९४९ |
| आठवे | १६ मे, १९४९ ते १६ जून, १९४९ |
| नववे | ३० जुलै, १९४९ ते १९ सप्टेंबर, १९४९ |
| दहावे | ६ ऑक्टोबर, ते १७ ऑक्टोबर, १९४९ |
| अकरावे | १४ नोव्हेंबर, १९४९ ते २६ नोव्हेंबर, १९४९ |

## ➢ घटनापरिषदेचे कार्य :-

- पहिल्या अधिवेशनात पं. जवाहरलाल नेहरु यांनी उद्दिष्टांचा ठराव मांडला. राज्यघटना तयार करताना तिची उद्दिष्टे निश्चित करणे महत्त्वाचे होते. ती निश्चित झाल्यामुळे घटनापरिषदेच्या कार्याला सुस्पष्ट दिशा मिळाली.

### ❑ घटनेची निर्मिती तीन ठळक टप्प्यांतून झाली :

१) प्रथमत: वेगवेग•या विषयांच्या समित्यांनी आपल्या विषयासंबंधी सविस्तर चर्चा करुन आपले अहवाल मसुदा समितीकडे सादर केले. या अहवालांवर विचारविनिमय करुन मसुदा समितीने घटनेचा पूर्ण मसूदा तयार केला व तो घटना परिषदेला सादर करण्यात आला. घटनासमितीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव खुद्द महात्मा गांधींनी सुचवले होते.

२) घटनापरिषदेत त्यातील प्रत्येक कलमावर चर्चा झाली. तसेच देशातील वृत्तपत्रांतून त्यावर चर्चा झाली. राजकीय नेते व कायदेतज्ज्ञ यांनी आपली मते व्यक्त केली. घटनापरिषदेत जवळजवळ वर्षभर या मसुद्यावर चर्चा चालू होती. मूळ मसुद्यात अनेक दुरुस्त्या सुचविण्यात आल्या.

३) त्यातील ज्या दुरुस्त्या स्वीकारण्यात आल्या त्यानुसार आवश्यक ते फेरबद्दल करुन मसुदा समितीने अंतिम मसुदा तयार केला. त्यावर पुन्हा घटनापरिषदेत चर्चा झाली. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटनापरिषदेने राज्यघटनेला स्वीकृती दिली व २६ जानेवारी, १९५० रोजी ती अमलात आली.
मात्र राज्यघटनेतील अ) नागरिकत्व ब) निवडणुका क) हंगामी संसद ड) घटनेच्या एकविसाव्या विभागातील अस्थायी व संक्रमणीय तरतूदी या घटनेचा स्वीकार झाल्यापासून म्हणजेच २६ नोव्हेंबर, १९४९ पासून अमलात आल्या. ज्या १९३५ च्या कायद्यात नमूद करण्यात आल्या होत्या.

- अमेरिकेत संघराज्य पध्दती आहे, मात्र तेथे घटक राज्ये आणि संघराज्ये यांची न्यायदान यंत्रणा दुहेरी आहे.
- तेथे प्रत्येक घटक राज्यातील उच्च न्यायालय हेच त्या राज्याचे सर्वोच्च न्यायालय आहे.
- त्यांच्या संघ न्यायालयाचे घटक राज्याच्या न्यायालयावर कोणतेही नियंत्रण नसते.
- भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला जे अधिकार भारतीय राज्यघटनेने प्राप्त करुन दिले आहेत, तशा स्वरुपाचे अधिकार अमेरिकेच्या संघ न्यायालयाला नाहीत.
- त्यामुळे अमेरिकेच्या संघ न्यायालयापेक्षा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती मोठी आहे, असे म्हणता येते.

- भारत हे गणराज्य (Republic) आहे.
- गणराज्य म्हणजे जेथे राज्यप्रमुख निवडून आलेले असतात असे राज्य भारतातील दोन्ही प्रमुख निवडून येतात.
- पंतप्रधान हे प्रत्यक्ष निवडणूकीने निवडून येतात, तर राष्ट्रपती हे अप्रत्यक्ष पध्दतीने निवडून येतात.
- इंग्लंडला मात्र गणराज्य म्हणता येणार नाही. कारण इंग्लंडचे राजा किंवा राणी हे पद निवडणुकीने भरले जात नाही.
- ते वंश परंपरेने पदावर येतात. म्हणून इंग्लंड गणराज्य नाही.
- कोणत्याही गणराज्यात राज्याचा व शासनाचा प्रमुख हे निवडून आलेले असतात.
- इंग्लंडमध्ये लोकशाहीच आहे, कारण लोकप्रतिनिधींमार्फत राज्यकारभार चालतो.

## ➢ भारतीय घटनेची आधारस्थाने :-


### ❑ इतर देशांच्या राज्यघटनेचे काही स्त्रोत

| क्र. | स्त्रोत | | स्वीकारलेली वैशिष्टये |
|---|---|---|---|
| १ | भारतीय स्वातंत्र्य लढा | | ऐहिक राष्ट्रवाद, जबाबदार व प्रातिनिधिक शासन, कल्याणकारी राज्याचा आशय |
| २ | भारत सरकार कायदा १९३५ | | संघराज्यीय व्यवस्था, गव्हर्नरचे पद, न्यायमंडळ, लोकसेवा आयोग, आणीबाणीविषयक तरतूदी आणि प्रशासकीय विस्तृत माहिती |
| ३ | ब्रिटिश राज्यघटना |  | कायद्याचे राज्य, संसदीय शासन, कायदेमंडळ कार्यपध्दती, एकेरी नागरिकत्व, कॅबिनेट व्यवस्था, आदेश देण्याचा विशेष हक्क, संसदीय विशेषाधिकार आणि द्विसभागृह |
| ४ | अमेरिकेची राज्यघटना |  | मूलभूत हक्क, न्यायमंडळाचे स्वातंत्र्य, न्यायालयीन पुनर्विलोकन, राष्ट्रपतींवरील महाभियोग, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना पदावरुन दूर करणे आणि उपराष्ट्रपींचे पद |
| ५ | आयर्लंडची राज्यघटना |  | राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, राज्यसभेवर सदस्यांची नामनिर्देशित आणि राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची पध्दत |
| ६ | कॅनडाची राज्यघटना |  | प्रबळ केंद्रासहित संघराज्य, केंद्राकडे शेषाधिकार, केंद्राकडून राज्यातील राज्यपालांची नियुक्ती आणि सर्वोच्च न्यायालयाचे सल्लाविषयक अधिकारक्षेत्र |
| ७ | ऑस्ट्रेलियाची राज्यघटना |  | समवर्ती सूची, व्यापार - उदीम आणि दळणवळणाचे स्वातंत्र्य, संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक |
| ८ | जर्मनीची वायमर राज्यघटना |  | आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्कांची तहकुबी |
| ९ | सोव्हिएत (रशिया) राज्यघटना |  | मूलभूत कर्तव्ये आणि सरनाम्यामध्ये न्यायाची उद्दिष्टे (सामाजिक, आर्थिक आणि राजकीय) |
| १० | फ्रान्सची राज्यघटना |  | गणराज्य आणि सरनाम्यातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची उद्दिष्टे |
| ११ | दक्षिण आफ्रिकेची राज्यघटना |  | राज्यघटनेमध्ये दुरुस्ती करण्याची कार्यपध्दती आणि राज्यसभा सदस्यांची निवडणूक |
| १२ | जपानची राज्यघटना |  | कायद्याने प्रस्थापित केलेली कार्यपध्दती व मुलभूत कर्तव्ये |

## ➢ भारतीय संविधानांची वैशिष्टये


१) अंशत: परिदृढ व अंशत: अपरिवर्तनीय
२) लोकशाही गणराज्य
३) संसदीय शासनपध्दती
४) जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी राज्यघटना (लिखीत)
५) प्रभावशाली केंद्रशासन
६) द्विसभागृही कायदेमंडळ
७) मूलभूत हक्क
८) लिखित व सर्वात मोठी राज्यघटना
९) राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे
१०) स्वतंत्र निवडणूक आयोग
११) संविधानात दुरुस्ती करण्यासाठी तरतूदी
१२) न्यायमंडळाचे स्वातंत्र्य
१३) धर्मनिरपेक्षता
१४) सुदृढ केंद्रीय संघराज्य
१५) राज्यघटना लवचिक व ताठर
१६) प्रौढ मताधिकार
१७) एकेरी नागरिकत्व
१८) विविध राज्यघटनांचे संमिश्रण
१९) केंद्रीय सत्तेचे विकेंद्रीकरण

## ➢ भारतीय मानचिन्हे व प्रतिके



१) भारताचा राष्ट्रध्वज मॅडम कामा यांनी प्रथम तयार केला व तो इंग्लंडमध्ये फडकावला.
२) भारताचा राष्ट्रध्वज तिरंगी असून तीन समांतर पट्टयांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. त्यातील पहिला भाग केशरी, दुसरा भाग पांढरा व तिसरा भाग गडद हिरवा अशी विभागणी करण्यात आली आहे.
३) राष्ट्रध्वजातील पांढऱ्या पट्टयावर गडद निळया रंगाचे अशोकचक्र आहे. हे अशोकचक्र सारनाथ येथील अशोकस्तंभावरुन घेण्यात आले आहे. याला २४ आरे आहेत.
४) भारतीय राष्ट्रध्वजाला घटनासमितीने २२ जुलै १९४७ रोजी संमती दिली.
भारताचा राष्ट्रध्वज हा आयताकृती असून लांबी ३ मी. व रुंदी २ मी. इतकी आहे. ३:२ प्रमाण

## ➢ भारतीय राष्ट्रध्वजाचा प्रवास




## ➢ भारताचे राष्ट्रीय गीत :- स्फूर्तीगीत



१) भारताचे 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत आहे.
२) हे गीत बंकीमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिले आहे.
३) हे राष्ट्रीय गीत इ.स. १८९६ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात प्रथम गायले गेले.
४) घटनासमितीने २४ जानेवारी १९५० ला मान्यता दिली.

## ➢ राष्ट्रीय कॅलेंडर :- शालीवहन शके १९३४

१) शक काळावर आधारित चैत्र महिन्यापासून सुरु होणारे ३६५ दिवसांचे राष्ट्रीय कॅलेंडर आहे.
२) २२ मार्च १७५७ पासून भारतात याचा वापर केला जातो.
३) या कॅलेंडरचा वापर गॅझेट ऑफ इंडिया, सरकारी कॅलेंडर, शासकीय परिपत्रिके इ. मध्ये केला जातो.
४) चैत्रशुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) यावेळी नवीन वर्षाची सुरुवात होते. चैत्रशुद्ध प्रतिपदा २१ मार्च व लीप वर्षात २२ मार्चला येते.

## ➢ राष्ट्रीय प्राणी :-



१) वाघ हा देशाचा राष्ट्रीय प्राणी आहे. प. बंगालमध्ये आढळणारा पांढऱ्या पट्टयाचा पट्टेदार वाघ शास्त्रीय नाव (पॅंथेरा टायग्रीस)
२) भारताने डॉल्फिन हा राष्ट्रीय जलप्राणी म्हणून घोषित करण्यात आला आहे. (इ.स. २०१०)
३) हत्तीला राष्ट्रीय वारसा म्हणून घोषित करण्यात आले आहे. (२०१०)

## ➢ राष्ट्रीय पक्षी :- 'पॅव्हो क्रिस्टट्स' या प्रजातीचा मोर.

## ➢ राष्ट्रीय फूल :- कमळ शास्त्रीय नाव :- 'नेल्युंबो न्युसीफेस'

## ➢ राष्ट्रीय पुरस्कार :-

| | |
|---|---|
| **नागरी पुरस्कार** | **१) भारतरत्न.**<br>**२) पद्मविभूषण**<br>**३) पद्मभूषण** |
| **सेनादलातील पुरस्कार** | १) परमवीरचक्र<br>२) महावीरचक्र<br>३) वीरचक्र<br>४) अशोकचक्र<br>५) किर्तीचक्र |
| **क्रिडा क्षेत्र** | १) मेजर ध्यानचंद खेलरत्न<br>२) अर्जुन पुरस्कार |
| **चित्रपट क्षेत्र** | १) दादासाहेब फाळके पुरस्कार |

★★★★★★★★★★★★★★★★★★★★